# नेताजी सुभाषचंद्र बोस आणि आझाद हिंद सेना

दुसऱ्या महायुद्धाच्या प्रारंभी इग्लंड व दोस्त राष्ट्रे आणि अक्ष गट म्हणजे जर्मनी, इटली व जपान यांच्याबद्दल धोरण कसे असावे यावरून काँग्रेसचे एक नेते सुभाषचंद्र बोस व गांधीजी यांच्यात मतभेद निर्माण झाले होते. हे मतभेद टोकाला गेले आणि सुभाषचंद्रांनी 'फॉरवर्ड ब्लॉक' हा आपला वेगळा पक्ष स्थापन केला. इंग्लंड युद्धात अडकले आहे याचा फायदा घेऊन भारतीयांनी ब्रिटिश शासनाविरुद्ध व्यापक चळवळ हाती घ्यावी असा सुभाषचंद्रांचा आग्रह युद्धाच्या प्रारंभापासून होता. काँग्रेसच्या गांधीजी व इतर ज्येष्ठ नेत्यांनी सुभाषचंद्रांच्या मागणीला त्या वेळी नकार दिला असला तरी ऑगस्ट, १९४२ मध्ये काँग्रेसने 'छोडो भारत' ही ब्रिटिश सत्तेविरुद्धची चळवळ हाती घेतली. मात्र जेव्हा ही चळवळ काँग्रेसने हाती घेतली त्या वेळी सुभाषचंद्रांनी परदेशात जाऊन इंग्लंडच्या शत्रूंच्या मदतीने भारतीय स्वातंत्र्यासाठी प्रयत्न सुरू केले होते.

सुभाषचंद्रांची शासनविरोधी लढ्याची मागणी जरी १९३९ मध्ये काँग्रेसने स्वीकारली नसली तरी त्यांनी व्यक्तिगत पातळीवर इंग्लंडच्या भारतातील युद्धप्रयत्नांना आपला विरोध सुरूच ठेवला. सुभाषचंद्रांनी भारतीयांना आवाहन केले की, त्यांनी ब्रिटिश शासनाला युद्धप्रयत्नात कुठल्याही प्रकारची मदत करू नये; यामुळे शासनाने सुभाषचंद्रांना जुलै, १९४० मध्ये अटक करून तुरुंगात ठेवले. आपल्याला झालेली अटक अन्यायकारक असून

त्यासाठी त्यांनी आमरण उपोषण सुरू केले. डिसेंबर १९४० मध्ये शासनाने सुभाषचंद्रांची तुरुंगातून मुक्तता केली व त्यांना विश्रांतीसाठी घरी जाऊ दिले. सुभाषचंद्रांची प्रकृती यावेळी ठीक नव्हती. ते घरी विश्रांती घेत असतानाही शासनाने त्यांच्या हालचालींवर सक्त पहारा ठेवला होता.

**सुभाषचंद्रांचे जर्मनीस प्रयाण**

तुरुंगात असताना सुभाषचंद्र या मताला येऊन पोहोचले होते की, भारताच्या स्वातंत्र्यासाठी व्यापक सशस्त्र उठावाची गरज आहे आणि अशा सशस्त्र संघर्षासाठी इंग्लंडच्या शत्रूंची मदत घेण्यास हरकत नाही; परंतु हे साध्य करण्यासाठी भारताबाहेर जाऊन प्रयत्न करणे गरजेचे आहे. या हेतूने त्यांनी जर्मनीस जाण्याचे ठरविले; कारण जर्मनीने इंग्लंडविरुद्ध युद्ध घोषित केले होते. सुभाषचंद्रांवर पोलिसांचा पहारा असल्यामुळे त्यांनी गुप्तपणे घरातून पलायन केले. सुभाषचंद्र हे घरी नसल्याचे २६ जानेवारी, १९४१ रोजी उघडकीस आले. या काळात कोलकात्यातील आपल्या घरातून बाहेर पडून सुभाषचंद्र यांनी प्रथम पेशावरमार्गे काबूल गाठले. त्यानंतर ते रशियाची राजधानी मॉस्को येथे पोहचले आणि रशियातून ते जर्मनीत बर्लिन येथे ३ एप्रिल, १९४१ रोजी पोहोचले. काबूलहून जर्मनीला जाण्यासाठी त्यांना रशियन राजदुतापेक्षा इटालियन राजदुताची मदत झाली.

**जर्मनीतील वास्तव्य**

जर्मनीतील आपल्या वास्तव्यात सुभाषचंद्रांनी हिटलरचा विश्वासू सहकारी रिबेन्ट्रॉप याची भेट घेतली आणि आपल्या मागण्या त्यांच्यासमोर मांडल्या–

(१) सुभाषचंद्रांना बर्लिनमधून रेडिओद्वारे ब्रिटिश सत्तेविरुद्ध प्रचाराला मुभा असावी.

(२) जर्मनीच्या ताब्यात आलेल्या ब्रिटिश सैन्यातील भारतीय सैनिकांना सुभाषचंद्रांच्या ताब्यात द्यावे; ज्यातून ते भारताच्या मुक्तीसाठी सैन्याची उभारणी करू शकतील.

(३) अक्ष गटातील राष्ट्रांनी (जर्मनी, इटली व जपान) भारतीय स्वातंत्र्याला मान्यता द्यावी. या मागण्यांपैकी रेडिओवरून प्रचाराची मागणी ताबडतोब मान्य करण्यात येऊन सुभाषचंद्रांना रेडिओवरून प्रचाराची परवानगी देण्यात आली. भारतीय सैन्य–उभारणीलाही जर्मनीने अनुकूलता दाखविली. मात्र भारतीय स्वातंत्र्याची घोषणा करण्यास हिटलर उत्सुक नव्हता.

इ. स. १९४१ मध्ये सुभाषचंद्र बोस यांनी जर्मनीमध्ये तेथील भारतीयांच्या मदतीने 'फ्री इंडिया सेंटर' स्थापना करून त्याच्या अनेक शाखा काढल्या. आपल्या जर्मनीतील वास्तव्याच्या काळात सुभाषचंद्रांनी स्वतंत्र प्रक्षेपण केंद्रांच्याद्वारे भारतीयांना उद्देशून रेडिओवरून काही भाषणे केली. सुभाषचंद्रांनी जर्मनीत असताना जर्मनीचा प्रमुख हिटलर याचीही भेट घेतली; परंतु हिटलरकडून भारतीय स्वातंत्र्यासाठी काही भरीव मदत होऊ शकणार नाही या निष्कर्षाप्रत ते येऊन पोहोचले. मात्र जर्मनीत असताना आणि नंतर पुढे जपानमध्ये असतानाही आपण परकीय शक्तींची मदत घेत असलो तरी आपण देशाचा व देशवासीयांचा सन्मान टिकवून, त्याबाबत कुठलीही तडजोड न करता, ही मदत घेत आहोत, असे सुभाषचंद्रांनी वारंवार स्पष्ट केले. याच सुमारास सुभाषचंद्रांना जपानमध्ये वास्तव्यास असलेल्या रासबिहारी बोस यांच्याकडून जपानला येण्याचे निमंत्रण मिळाले आणि त्यानंतर सुभाषचंद्रांनी जर्मनी सोडून जपानला जाण्याचा निर्णय घेतला.

**जर्मनीहून जपानला प्रयाण**

जपानने पूर्वेकडील देशांत युद्धात मिळविलेल्या विजयाच्या बातम्या सुभाषचंद्रांपर्यंत पोहोचत होत्या. जपान आणि भारत यांच्यामधील ब्रह्मदेश (म्यानमार), मलाया, थायलंड इत्यादी पूर्वेकडील देशांत मूळ भारतीय असलेले अनेक लोक स्थायिक झालेले होते, ज्यांची सक्रिय मदत भारतीय स्वातंत्र्यलढ्यासाठी मिळण्याची शक्यता होती. जपानमध्ये काही भारतीयांनी भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीकरिता सैन्य–उभारणीसाठी यशस्वी प्रयत्न केले होते.

त्याचबरोबर व्यापक नागरी संघटनही त्यांनी उभे केले होते. या संघटनेच्या प्रमुखांपैकी एक रासबिहारी बोस यांनी सुभाषचंद्रांना जपानमध्ये येऊन त्यांच्या सैन्याचे व नागरी संघटनेचे नेतृत्व करण्याचे निमंत्रण दिले. त्यानुसार सुभाषचंद्रांनी जर्मनी सोडून जपानला जाण्याचा निर्णय घेतला. प्रथम जर्मनीच्या 'यू' बोटीतून आणि नंतर जपानी पाणबुडीतून साहसी प्रवास करून सुभाषचंद्र बोस जून, १९४३ मध्ये जपानला पोहोचले. या स्थलांतरातून सुभाषचंद्रांच्या समर्पित जीवनातील अंतिम संघर्षपर्वाला प्रारंभ झाला.

**रासबिहारींची जपानमधील कामगिरी**

आशियातील अनेक देशांत मूळचे भारतीय असलेल्या अनेक व्यक्तींनी एकत्र येऊन भारतीय स्वातंत्र्याला मदत करण्याच्या हेतूने संघटना स्थापन केल्या होत्या. या संघटनांना एकत्र आणून त्यांची एक व्यापक संघटना उभी करण्याचे रासबिहारी बोस यांनी ठरविले. याचा उल्लेख पूर्वी केलेला आहे की, रासबिहारी बोस हे भारतातील क्रांतिकारी चळवळीतील एक सक्रिय आणि प्रमुख क्रांतिकारक होते. भारतातील क्रांतिकारी उठावात अपयश आल्यानंतर १९१५ मध्ये ते पोलिसांकडून अटक टाळण्यासाठी भारत सोडून जपानला आले व तिथेच राहिले.

इ. स. १९४२ मधील मार्च महिन्याच्या अखेरीस जपानची राजधानी टोकियो येथे भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीला मदत करू इच्छिणाऱ्या, पूर्वेकडील देशांत राहणाऱ्या भारतीयांची एक परिषद बोलावण्यात आली होती. या परिषदेत 'आझाद हिंद सेना' हे सैनिक दल आणि 'इंडियन इंडिपेन्डन्स लीग' हे नागरी संघटन उभारण्यात यावे असे दोन महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. याशिवाय या परिषदेत ठरल्याप्रमाणे १५ ते २३ जून या काळात दुसरी परिषद बोलावण्यात आली. या परिषदेला ब्रह्मदेश (म्यानमार), मलाया, थायलंड, इंडो-चायना, जपान, चीन, इंडोनेशिया, हाँगकाँग, फिलिपाईन्स इत्यादी देशांतून प्रतिनिधी उपस्थित होते. या परिषदेचे अध्यक्ष म्हणून रासबिहारी बोस यांची निवड करण्यात आली. 'इंडियन इंडिपेन्डन्स लीग' (भारतीय स्वातंत्र्य संघ) या संघटनेची स्थापना बँकॉकच्या परिषदेत करण्यात आली. या संस्थेचे उद्दिष्ट अर्थातच भारताची स्वातंत्र्यप्राप्ती हे होते. या परिषदेने सुभाषचंद्र बोस यांना इंडिपेन्डन्स लीगचे नेतृत्व करण्यासाठी पूर्व आशियात येण्याचे निमंत्रण दिले.

**आझाद हिंद सेनेची स्थापना**

डिसेंबर, १९४१ मध्ये मलायात जपानी फौजांनी ब्रिटिश सैन्याचा पराभव केला होता. त्यात कॅप्टन मोहनसिंग हे अधिकारी जपान्यांच्या ताब्यात आले होते. त्यांनी जपानच्या हाती पडलेल्या भारतीय युद्धबंद्यांमधून सैन्य उभारावे व त्याचे नेतृत्व करावे असा आग्रह ग्यानी प्रीतमसिंग आणि मेजर फुजिवारा यांनी केला. फेब्रुवारी, १९४२ मध्ये जपानने सिंगापूर ब्रिटिशांकडून जिंकले. यावेळी पकडण्यात आलेल्या ब्रिटिश सैन्यात चाळीस हजार भारतीय सैनिक होते. त्यांना जपानी सरकारच्या स्वाधीन करण्यात आले; नंतर मेजर फुजिवारा यांनी हे सैन्य कॅप्टन मोहनसिंग यांच्याकडे सुपूर्द केले. यातूनच आझाद हिंद सेना किंवा फौज उभी करण्यात आली. १ सप्टेंबर, १९४२ रोजी आझाद हिंद सेनेची स्थापना करण्यात आली. इंडियन इंडिपेन्डन्स लीगने आझाद हिंद सेनेला माणसे, पैसा आणि इतर साहित्य पुरविण्याची जबाबदारी स्वीकारली. दुर्दैवाने रासबिहारी बोस आणि कॅप्टन मोहनसिंग यांच्यात कार्यपद्धतीवरून मतभेद निर्माण झाले व त्याचा आझाद हिंद सेना व इंडियन इंडिपेन्डन्स लीग या संघटनांच्या कामावर परिणाम झाला; तसेच जपानी सेनाधिकारी आझाद हिंद सेनेचे स्वतंत्र अस्तित्व न मानता, आपल्याच सैन्याचा एक भाग म्हणून वागणूक देत होते. ही परिस्थिती बदलण्याची जबाबदारी सुभाषचंद्र बोस यांच्यावर सोपविण्याचा निर्णय घेण्यात आला. आझाद हिंद सेना व इंडियन इंडिपेन्डन्स लीग या दोन्ही संघटनांचे नेतृत्व करण्यासाठी जपानमध्ये येण्याचे निमंत्रण, जर्मनीमध्ये असलेल्या सुभाषचंद्र बोस यांना रासबिहारी बोस आणि कॅप्टन मोहनसिंग यांच्या वतीने पाठविण्यात आले.

## सुभाषचंद्रांचे जपानमध्ये आगमन

जपानमधील इंडियन इंडिपेन्डन्स लीग आणि आझाद हिंद सेनेचे निमंत्रण स्वीकारून सुभाषचंद्र बोस जर्मनीहून जपानला १३ जून, १९४३ रोजी येऊन पोहोचले. जपानमध्ये आल्यानंतर सुभाषचंद्रांनी जपानचे पंतप्रधान तोजो यांची भेट घेतली. जपानी पंतप्रधानांनी सुभाषचंद्रांना आश्वासन दिले की, भारतातून ब्रिटिशांना पराभूत केल्यानंतर जपानला भारतावर आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याची महत्त्वाकांक्षा नाही. भारत स्वतंत्र व्हावा हीच जपानची इच्छा आहे. जपानी पंतप्रधानांनी तेथील विधिमंडळात घोषणा केली की, 'भारतातून ब्रिटिशांचे वर्चस्व संपुष्टात आणण्यासाठी सुभाषचंद्र बोस आणि त्यांच्या संघटनेला सर्व प्रकारची मदत करण्याचा व भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्याचा जपानचा निर्धार आहे.' जपानमधून सुभाषचंद्रांनी रेडिओवरील भाषणाद्वारे भारतासह आशियातील इतर देशांतील भारतीयांना उद्देशून भाषणे केली. आपल्या भाषणात त्यांनी भारताच्या स्वातंत्र्यासाठी ब्रिटिशांविरुद्ध पूर्वेकडील आघाडीवर संघर्ष करण्याचा आपला निर्धार व्यक्त केला. त्याचबरोबर जपानची मदत भारतीय स्वातंत्र्यासाठी घेत असताना आपण आपला स्वाभिमान व देशाच्या स्वातंत्र्याबाबत तडजोड करणार नाही हेही सुभाषचंद्रांनी स्पष्ट केले.

२ जुलै, १९४३ रोजी सुभाषचंद्र बोस सिंगापूर येथे आले, जिथे त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले. ४ जुलै रोजी त्यांनी इंडियन इंडिपेन्डन्स लीग आणि आझाद हिंद सेना यांचे नेतृत्व रासबिहारी बोस व कॅप्टन मोहनसिंग यांच्याकडून स्वीकारले. इंडियन इंडिपेन्डन्स लीगचे पूर्वेकडील देशांतील अनेक प्रतिनिधी या समारंभाला उपस्थित होते. आझाद हिंद सेना व इंडियन इंडिपेन्डन्स लीग या दोन्ही संघटनांचे नेतृत्व स्वीकारल्यापासून सुभाषचंद्र बोस यांच्या नावापुढे 'नेताजी' हे आदरार्थी संबोधन लावले गेले आणि ते 'नेताजी' याच नावाने ओळखले गेले. आपल्या आझाद हिंद सेनेच्या साहाय्याने भारतीय स्वातंत्र्यासाठी संघर्ष करण्याचा मनोदय नेताजींनी व्यक्त केला आणि या संघर्षात अत्युच्च बलिदान, त्याग व कष्टाची तयारी ठेवण्याचे आवाहन त्यांनी आपल्या सैनिकांना केले. 'चलो दिल्ली'ची घोषणा त्यांनी या वेळी दिली. आझाद हिंद सेनेमधील तुकड्यांना गांधी व नेहरू यांसारख्या नेत्यांची नावे दिली होती. यावरून असे दिसते की, स्वातंत्र्यप्राप्तीसाठी काँग्रेसपेक्षा त्यांचा मार्ग भिन्न असला आणि ते यावेळी काँग्रेसमध्ये नसले तरी काँग्रेसच्या नेत्यांबद्दल त्यांना आदर होता. झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या नावाने महिलांची एक तुकडी आझाद हिंद सेनेत होती. या तुकडीचे नेतृत्व डॉ. लक्ष्मी स्वामीनाथन (सहगल) यांच्याकडे देण्यात आले होते. यावरून नेताजींना महिलांच्या क्षमतेबद्दल विश्वास आणि आदर होता व त्यांची शक्ती स्वातंत्र्यप्राप्तीसाठी उपयोगात यावी अशी नेताजींची इच्छा होती असे दिसते. आझाद हिंद सेनेत जगन्नाथराव भोसले, शहानवाझ खान हबीब उर रहमान, चटर्जी आदी मंडळी विविध अधिकारपदावर होती. आझाद हिंद सेनेत सर्वधर्मीयांना प्रवेश होता. 'जय हिंद' हे या सेनेचे अभिवादनाचे शब्द होते. 'कदम कदम बढाये जा' हे या सेनेचे प्रसिद्ध व लोकप्रिय गीत होते.

## हंगामी सरकारची स्थापना

आझाद हिंद सेनेच्या भरती, प्रशिक्षण इत्यादींची व्यवस्था लावल्यानंतर पूर्वी घोषित केल्याप्रमाणे नेताजी स्वतंत्र भारताच्या हंगामी सरकारच्या स्थापनेकडे वळले. हंगामी सरकारच्या स्थापनेमागे नेताजींचा उद्देश असा होता की, आझाद हिंद सेना ही भारताची सेना म्हणून ओळखली गेली पाहिजे आणि भारताच्या मुक्तीसाठीचे स्वातंत्र्ययुद्ध, स्वतंत्र भारताच्या हंगामी सरकारकडूनच लढले गेले पाहिजे. हंगामी सरकारला किमान अक्ष गटाची (जर्मनी, इटली व जपान) मान्यता मिळू शकत होती. एकूण भारतीय स्वातंत्र्ययुद्धाला अधिकृतपणा देण्यासाठी आणि जपानशी स्वतंत्र भारताच्या हंगामी सरकारचा प्रमुख म्हणून बरोबरीच्या नात्याने बोलणी करण्यासाठी आझाद हिंद सरकार स्थापन होणे नेताजींना आवश्यक वाटत होते.

या सरकारच्या स्थापनेला उपस्थित राहण्यासाठी इंडियन इंडिपेन्डन्स लीगच्या आशियाई देशांतील सदस्यांना निमंत्रित करण्यात आले होते. २१ ऑक्टोबर, १९४३ रोजी सिंगापूर येथील कॅथे सभागृहात स्वतंत्र भारताचे हंगामी सरकार स्थापन केल्याची घोषणा नेताजींनी केली. या वेळी नेताजींनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी ईश्वराला साक्षी ठेवून भारताच्या स्वातंत्र्यासाठी शेवटच्या श्वासापर्यंत लढण्याची शपथ घेतली. आझाद हिंद सरकारला जपान, इटली, जर्मनी इत्यादी देशांची मान्यता लगेच मिळाली. आझाद हिंद सरकारने इंग्लंड व अमेरिकेविरुद्ध युद्धाची घोषणा केली.

### आझाद हिंद सेना व पूर्वेकडील युद्ध

जपानी सेनाप्रमुख आझाद हिंद सेनेला प्रत्यक्ष युद्ध–आघाडीवर स्वतंत्रपणे लढू देण्यास तयार नव्हते. प्रत्यक्ष लढाईत भाग घेण्याऐवजी आझाद हिंद सेनेने हेरगिरी, प्रचार इत्यादी आवश्यक घटक जबाबदाऱ्या पार पाडाव्यात अशी जपानी सेनाप्रमुखांची इच्छा होती. जपानी सैन्य ब्रिटिश सैन्याशी लढाई करेल आणि नेताजींनी त्यावेळी भारतीय जनतेचा पाठिंबा मिळवावा अशीही जपानी सेनाप्रमुखांची इच्छा होती. आझाद हिंद सेनेला दुय्यम दर्जाची वागणूक देण्यामागे जपानी सेनाप्रमुखांना आझाद हिंद सेनेच्या सैनिकी सामर्थ्याबद्दल वाटणारा अविश्वास हे मुख्य कारण होते. नेताजींची तीव्र इच्छा होती की, भारताची ब्रिटिश जोखडाखालून मुक्तता आझाद हिंद सेनेच्या संघर्ष व बलिदानाद्वारे व्हावी. जपानच्या सैन्याकडून स्वातंत्र्यप्राप्ती त्यांना मान्य नव्हती. त्यासाठी आझाद हिंद सेना जपानी सैन्याबरोबर आघाडीवर असावी असा आग्रह नेताजींनी जपानी सैन्याच्या प्रमुखांकडे धरला. अखेर तडजोड होऊन आझाद हिंद सेनेच्या एका तुकडीला (रेजिमेन्ट) चाचणी म्हणून जपानी सैन्याबरोबर पाठविण्याचे ठरले. जपानी सैन्याच्या कसोटीला ही तुकडी उतरल्यास आझाद हिंद सेनेच्या बाकी सैन्याला जपानी सैन्याबरोबर पाठविण्याचा विचार केला जाईल असे ठरले. यावरून नेताजी आपल्या सैनिकांच्या आणि भारतीयांच्या स्वाभिमानाला व सन्मानाला किती महत्त्व देत होते हे दिसून येते.

### आझाद हिंद सेनेचा प्रत्यक्ष संघर्ष

इ. स. १९४४ च्या प्रारंभी जपानी सैन्य आणि आझाद हिंद सेनेची 'सुभाष ब्रिगेड' यांची संयुक्त फौज ब्रह्मदेशातील आराकानच्या प्रदेशात लढण्यासाठी जाण्यास निघाली. याच सुमारास नेताजींनी आपल्या आझाद हिंद सरकारचे मुख्य कार्यालय रंगूनला आणले. डिसेंबर, १९४३ मध्ये जपान सरकारने अंदमान व निकोबार ही बेटे ब्रिटिशांकडून जिंकून ती आझाद हिंद सरकारकडे सोपविली. नेताजींनी या बेटांचे नवे नामकरण 'शहीद' व 'स्वराज्य' असे केले.

मे, १९४४ मध्ये आझाद हिंद सेनेच्या तुकडीने भारताच्या हद्दीत असलेले मॉवडाक हे ठाणे जिंकले. आझाद हिंद सेनेच्या सैनिकांसाठी हा अतिशय आनंदाचा व उत्कट क्षण होता. भारताच्या भूमीला आझाद हिंद सेनेच्या तुकडीने आदराने वंदन केले व तिला स्पर्श केला. थोडेसे सैनिक मॉवडॉकच्या रक्षणासाठी ठेवून बाकी सैन्याने कोहीमाकडे प्रस्थान केले. आसाममधील नागा टेकड्यांच्या प्रदेशातील कोहीमा हे ठाणे जपानी सैन्याच्या मदतीने आझाद हिंद सेनेने ६ एप्रिल, १९४४ रोजी जिंकले; परंतु नंतर त्यांना तेथून माघार घ्यावी लागली.

त्यानंतर आझाद हिंद सेनेच्या सैनिकांनी भारतातील मणिपूर प्रदेशातील इंफाळ हे मुख्य ठाणे जिंकण्याचे ठरविले व वेढ्याची तयारी केली. याच सुमारास पावसाळा लवकर सुरू झाल्यामुळे परिस्थिती प्रतिकूल बनली. त्यांना होणाऱ्या रसदपुरवठ्याचे मार्ग शत्रूने अडविल्यामुळे अन्नधान्य, दारूगोळा यांचा पुरवठा आझाद हिंद सेनेला होऊ शकला नाही. रसदपुरवठ्याच्या अभावी लढाई सुरू ठेवणे अशक्य झाल्यामुळे जपानी सैन्याने माघार घेण्याचे ठरविले. आझाद हिंद सेनेच्या सैनिकांनी अनिच्छेने हा निर्णय मान्य केला. इ. स. १९४४ च्या हिवाळ्यात ब्रिटिश सैन्याने नव्या दमाने हल्ले सुरू केले.

एप्रिल, १९४५ मध्ये रंगून सोडण्याचा निर्णय जपानी सैन्याने घेतला; त्यामुळे आझाद हिंद सेनेलाही रंगून सोडावे लागले. याच सुमारास युरोपातही युद्धाचे चित्र पालटले होते. जर्मनी व इटली पराभवाच्या छायेत होते. पॅसिफिक महासागरात अमेरिकन नौदल व विमाने जपानी सैन्याविरुद्ध संघर्ष करीत होती. जपानला आपली विमाने, सैन्य, नौदल व इतर सैनिकी सामर्थ्य पूर्वेकडील आघाडीवरून पॅसिफिक महासागरातील युद्धक्षेत्राकडे वळवावे लागले. भारताच्या स्वातंत्र्यापेक्षा जपानला स्वत:च्या देशाचे रक्षण अधिक महत्त्वाचे होते. पॅसिफिक महासागरात जपानला बलाढ्य अमेरिकेशी सामना करावा लागत होता; यामुळे ब्रह्मदेश व भारताच्या पूर्वेकडील सीमेवर लढणाऱ्या जपानी सैन्याला व आझाद हिंद सेनेला जपानी विमानांचे संरक्षण मिळू शकले नाही आणि लढाईसाठी आव्हानात्मक इतर साधनसामग्री मिळू शकली नाही. ब्रिटिशांचे पूर्वेकडील लढाईत सामर्थ्य वाढण्याचे कारण अमेरिकेची मदत हे होते. इ. स. १९४५ च्या मध्यात नेताजी सिंगापूरला परतले तेव्हा त्यांना जपानने माघार घेण्याचे ठरवले असल्याचा निर्णय कळाला. नेताजींची आणि त्यांच्या आझाद हिंद सेनेतील सैनिकांची लढाई सुरू ठेवण्याची इच्छा असली तरी लष्करी मदतीअभावी व जपानच्या माघारीनंतर लढाई सुरू ठेवणे अवघड होते.

दुर्दैवाने १८ ऑगस्ट, १९४५ रोजी फार्मोसा (तैवान)मधील तेपेह येथून इंधन घेऊन मांचुरियातील डेरेनकडे उड्डाण करीत असताना नेताजींच्या विमानाला अपघात होऊन त्यात त्यांचे दु:खद निधन झाले; तथापि, अनेक कारणांमुळे नेताजींच्या या अपघाती मृत्यूबाबत अजूनही गूढ आहे.

**नेताजी व आझाद हिंद सेनेची कामगिरी**

नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी भारतीय स्वातंत्र्याबाबत केलेले कार्य अजोड आहे. त्यांनी काँग्रेस पक्षाच्या अंतर्गत बराच काळ काम केले; परंतु पक्षाशी झालेल्या मतभेदांनंतर स्वत:चा वेगळा 'फॉरवर्ड ब्लॉक' हा राजकीय पक्ष त्यांनी स्थापन केला. पुढे अहिंसेचा त्याग करून सैनिकी सामर्थ्याच्या बळावर इंग्लंडला पराभूत करून भारताला स्वतंत्र करण्याचे त्यांनी ठरविले. यासाठी त्यांनी प्रथम जर्मनीचा प्रमुख हिटलरशी संबंध प्रस्थापित केले; परंतु तिथे अपेक्षित यश येत नाही असे दिसल्यावर ते इंग्लंडचा दुसरा शत्रू, जपानकडे गेले. भारतातून गुप्तपणे जर्मनीला प्रयाण, तिथून पाणबुडीने जपानकडे प्रवास अशी अनेक साहसी कृत्ये त्यांनी पार पाडली.

आझाद हिंद सेनेचे संघटन, त्यांच्या लष्करी मोहिमा व आझाद हिंद सरकारची स्थापना यांत त्यांनी सेनापती व प्रशासक या नात्याने कौशल्य दाखविले. जर्मनी व जपानशी संबंध ठेवताना आणि मदत घेताना नेताजींनी स्वाभिमान टिकविला. आपल्या सैन्यात त्यांनी हिंदू, शीख, मुस्लीम इत्यादी जमातींच्या लोकांना जागा देऊन जातीय सलोखा व राष्ट्रीय ऐक्य साधले होते. महिलांनासुद्धा आपल्या सैन्यदलात त्यांनी योग्य ते स्थान दिले होते.

आझाद हिंद सरकार व आझाद हिंद सेना चालविण्यासाठी नेताजींना पैसा उभा करावा लागला, तो त्यांनी प्रामुख्याने आशियायी देशांतील भारतीयांकडून व सहानुभूती असलेल्या इतर नागरिकांकडून मिळविला. हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे की, ज्या ब्रिटिश सैन्याविरुद्ध ते लढत होते त्याच्यामागे इंग्लंडचे बलाढ्य साम्राज्य भक्कमपणे उभे होते. ही आझाद हिंद सेना व ब्रिटिश सेना यांच्यातील विषम परिस्थिती लक्षात घेता नेताजींच्या अपयशापेक्षा त्यांचे प्रयत्न अधिक मोलाचे व महत्त्वाचे ठरतात.

आपल्या सैनिकांबद्दल त्यांना आत्यंतिक प्रेम व काळजी होती आणि तशाच प्रकारची निष्ठा व प्रेम त्यांना त्यांच्या सैनिकांकडून प्राप्त झाले. नेताजींच्या शौर्य व बलिदानाने अनेक तरुणांना राष्ट्रभक्तीची प्रेरणा दिली. 'तुम मुझे खून दो मैं तुम्हें आझादी दूँगा' या त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन अनेक तरुणांनी आझाद हिंद सेनेला विविध प्रकारे मदत केली. त्या काळातील अनेक तरुणांच्या ओठावर आझाद हिंद सेनेची गीते होती.

स्वतंत्र भारताच्या हंगामी आझाद हिंद सरकारने भारतीय स्वातंत्र्याचा प्रश्न ब्रिटिश साम्राज्याच्या मर्यादित क्षेत्रातून काढून त्याला आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त करून दिले. जपानसह काही देशांनी आझाद हिंद सरकारला

मान्यता दिली होती. अमेरिका व चीन यांनीही इंग्लंडकडे भारतीयांना स्वातंत्र्य देण्याबाबत आग्रह धरला. रशियाचाही वसाहतवाद व साम्राज्यवादाला विरोध होता. नेताजींच्या आझाद हिंद सरकारच्या स्थापनेच्या कृतीमुळे आंतरराष्ट्रीय क्षेत्रात भारतीय स्वातंत्र्याच्या प्रश्नाला प्रेरणा मिळाली.

आझाद हिंद सेनेने हे दाखवून दिले की, ते ब्रिटिशांचे भाडोत्री सैनिक नव्हते तर मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण करण्याची तयारी असलेले देशभक्त सैनिक होते. भारतीय सैनिकांनी अपुऱ्या व तुटपुंज्या साधनसामग्रीसह शत्रूशी लढताना शौर्य दाखविले व काही लढाया जिंकल्या. स्वतंत्रपणे आपण लढायांची आखणी करून त्यांचे नेतृत्व करू शकतो हे आझाद हिंद सेनेच्या अधिकाऱ्यांनी दाखवून दिले. भारतात अहिंसक आंदोलन ब्रिटिश सत्तेविरुद्ध जरी याच सुमारास चालत असले तरी वेळ पडल्यास भारतीयांमध्येही सशस्त्र संघर्ष करण्याची क्षमता आहे, हे आझाद हिंद सेनेने दाखवून दिले.

आझाद हिंद सेनेच्या सैनिकांना भारताला ब्रिटिश वर्चस्वाखालून मुक्त करण्यामध्ये जरी प्रत्यक्ष यश आले नसले तरी अप्रत्यक्षरीत्या या कार्याला त्यांचा हातभार लागलेला होता. ब्रिटिश सैन्यातील भारतीय सैनिकांच्या मनात देशभक्ती व ब्रिटिश साम्राज्यविरोध जागृत होण्यासाठी आझाद हिंद सेनेने प्रेरणा दिली. भारतातील ब्रिटिश सत्तेचा मुख्य आधार असलेल्या सैन्यामध्ये अशा रीतीने देशभक्तीची भावना रुजवून आझाद हिंद सेनेने ब्रिटिश सत्तेचा आधार खिळखिळा केला असे म्हणता येईल. ब्रिटिश सैन्यात, नौदलात व विमानदलात भारतात जे उठाव नंतर झाले त्यांमागे आझाद हिंद सेनेच्या प्रेरणेचा मोठा प्रभाव होता असे मानण्यास जागा आहे.

**आझाद हिंद सेनेच्या अधिकाऱ्यांवरील खटला**

इ. स. १९४५ मध्ये आझाद हिंद सेनेच्या अनेक सैनिकांना आणि अधिकाऱ्यांना ब्रिटिश सैन्याने ब्रह्मदेशातून जपानी सैन्याच्या माघारीनंतर कैद केले आणि त्यांना युद्धकैदी म्हणून भारतात आणले. या सैनिकांवर आणि अधिकाऱ्यांवर शासनाने राजद्रोहाचा आरोप ठेवून खटले भरले. यांपैकी एक खटला दिल्लीच्या लाल किल्ल्यात लष्करी न्यायालयापुढे १९४५ मध्ये सुरू झाला. आझाद हिंद सेनेच्या अधिकाऱ्यांवर प्रामुख्याने इंग्लंडच्या राजाविरुद्ध युद्ध पुकारल्याचा आरोप होता. आझाद हिंद सेनेच्या शहानवाज खान, सहगल आणि धिल्लो या तीन अधिकाऱ्यांविरुद्ध हा खटला चालविला गेला.

काँग्रेसने या खटल्यातील आरोपी म्हणजेच आझाद हिंद सेनेच्या अधिकाऱ्यांची बाजू उचलून धरून त्यांना पाठिंबा दिला; तसेच त्यांच्या कार्याचा गौरव करून त्याबद्दल अभिमान व्यक्त केला. काँग्रेसने या अधिकाऱ्यांच्या बाजूने वकील म्हणून काम पाहण्यासाठी एक समिती स्थापन केली, ज्यात भुलाभाई देसाई, जवाहरलाल नेहरू, तेजबहादूर सप्रू आणि कैलासनाथ काटजू यांचा समावेश होता. या खटल्याच्या काळात आझाद हिंद सेनेने केलेल्या कार्याचा तपशील ब्रिटिश शासनाने आरोप म्हणून जरी सादर केला असला तरी भारतीयांना सेनेच्या पराक्रमाची माहिती त्यातून कळाली. काँग्रेसप्रमाणे अन्य राजकीय पक्षांनीही आझाद हिंद सेनेच्या अधिकाऱ्यांना आपला पाठिंबा व्यक्त केला. या अधिकाऱ्यांच्या मदतीसाठी जनतेकडून निधी गोळा करण्यात आला.

आझाद हिंद सेनेच्या समर्थनार्थ ठिकठिकाणी मोर्चे आयोजित केले जाऊन या देशभक्त अधिकाऱ्यांना राजद्रोही ठरविल्याबद्दल ब्रिटिश शासनाचा निषेध केला गेला. शासनाच्या या कृतीबद्दल जनतेत व्यापक असंतोष निर्माण झाला. वस्तुतः शासनाला या खटल्यातून हे दाखवून द्यावयाचे होते की, जे सैनिक ब्रिटिश शासनाशी एकनिष्ठ राहणार नाहीत त्यांना कडक शिक्षा केली जाईल आणि शासन अशा प्रकारची बेशिस्त खपवून घेणार नाही; परंतु याचा उलटा परिणाम होऊन आझाद हिंद सेनेच्या अधिकाऱ्यांबद्दल व्यापक सहानुभूती, अभिमान आणि गौरवाची भावना निर्माण झाली आणि ती व्यक्तही झाली. याला कारण असे होते की, आझाद हिंद सेनेचे अधिकारी आणि सैनिक, ब्रिटिश शासनाच्या दृष्टिकोनातून भलेही राजद्रोही असले, तरी भारतीयांच्या दृष्टिकोनातून ते स्वातंत्र्ययोद्धे होते.